# RASHTRASANT TUKDOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY PRAYER

या भारतात बंधु भाव नित्य वसू दे ।

दे वरचि असा दे ।

हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे,

मतभेद नसू दे ।।धृ ।।

नांदोत सुखे गरिब – अमिर एक मतानी ।

मग हिंदू असो ख्रिश्चन, वा हो इस्लामी ।

स्वातंत्र्यसुखा या सकलांमाजि वसू दे ।

दे वरचि असा दे ।।१ ।।

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना

हो सर्वस्थळी मिळूनि समुदाय – प्रार्थना ।

उद्योगि तरुण वीर शीलवान दिसू दे ।

दे वरचि असा दे ।।२ ।।

हा जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही ।

अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी ।

खळ निंदका मनीहि सत्य न्याय वसू दे ।

दे वरचि असा दे ।।३ ।।

सौंदर्य रमो घर – घरात स्वर्गीयापरी ।

ही नष्ट होऊ दे विपत्ति भीती बोहरी ।

तुकड्यास सदा सर्वदा सेवेत कसू दे ।।

दे वरचि असा दे ।।४ ।।